# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पवित्र आत्म्याच्या आगमनाचा रविवार – १९ मे २०२४

## श्रद्धावंताच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपले प्रेषितीय कार्य प्रभावीपणे करण्यासाठी पवित्र आत्म्याचे सामर्थ्य व मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. मतदान करणे हे आपले राजकीय कर्तव्य आहे ह्या भावनेने सर्वांना मतदान करण्यास पवित्र आत्म्याद्वारे प्रेरणा लाभावी, आपले मतदान शांततेने व सत्यपूर्वक पार पडून आपल्या देशासाठी एक चांगले कार्य करणारे सरकार निवडून यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र आत्म्याच्या आगमनाने शिष्यात नवचैतन्य निर्माण झाले आणि त्याच्याच सामर्थ्याने आज ख्रिस्तसभा उजळून निघत आहे. पवित्र आत्म्याच्या दानांचा आपल्यावर वर्षाव व्हावा व आपल्याद्वारे आपले धर्मग्राम व धर्मप्रांत प्रकाशमय व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. जगभरातील सर्व कॅरजमॅटीक प्रार्थना संघाद्वारे प्रभू शब्दाची देवाण घेवाण उचित प्रकारे व्हावी व देवशब्द प्रत्येक घराघरात व जन माणसात रूजवला जावा तसेच सांडोर येथे उद्या / आज संपन्न होत असलेला भव्य पेन्टेकॉस्ट मेळावा व्यवस्थित पार पडावा म्हणून आपण पवित्र आत्म्याकडे प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा, प्रवासात असलेल्यांवर प्रभूचा वरदहस्त असावा, सर्व जगभर शांती नांदावी तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.